मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 'बटरफ्लाय ब्रिज' ठरतोय आकर्षणाचा केंद्रबिंदू..!

## उच्च दर्जाचे एलईडी तंत्रज्ञान वापरत करण्यात आली विद्युत रोषणाई; रंगोत्सव नागरिकांना आकर्षित

**पिंपरी | प्रतिनीधी**

रंगीबेरंगी झगमगाटाने उजळलेला ब्रिज... विविध रंगांच्या छटा निर्माण करणारी रोषणाई... असा वेगळाच अनुभव थेरगाव ते चिंचवड दरम्यानच्या बटरफ्लाय ब्रिजवरून प्रवास करताना नागरिकांना येत आहे. पवना नदीवर उभारलेला हा ब्रिज आता रोषणाईच्या झळाळीने अधिकच खुलून दिसत असून, रात्रीच्या वेळी ब्रिजवर साकार होणारा हा रंगोत्सव नागरिकांना आकर्षित करत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून शहरात आधुनिक पायाभूत सुविधा उभारण्याबरोबरच शहरात सौंदर्यपूर्ण वास्तू उभारण्यावर भर दिला जात आहे. थेरगाव येथे पवना नदीवर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने उभारण्यात आलेला बटरफ्लाय ब्रिज हा त्याचाच एक भाग आहे. हा पूल आता शहराचे एक नवे आकर्षण ठरत आहे. ब्रिजचे अनोखे डिझाइन हे शहराच्या सौंदर्यात भर घालणारे असून, आता महापालिकेच्या विद्युत विभागाच्या वतीने ब्रिजवर करण्यात आलेली आकर्षक विद्युत रोषणाई त्याच्या देखणेपणात अधिकच भर घालत आहे.



या रोषणाईसाठी उच्च दर्जाचे एलईडी लिनिअर वॉश लाईट्स (IP65) बसवण्यात आले आहेत. या लाईट्सना ५१२ डीएमएक्स पॉवरसह आरजीबी तंत्रज्ञानाची जोड देण्यात आली असून, त्यामुळे ब्रिजवरील रोषणाई विविध रंगांच्या छटा निर्माण करत प्रत्येक क्षणी वेगळेच दृश्य साकारते. रात्रीच्या वेळी ब्रिजवरून जाणाऱ्या वाहनचालकांसाठी तसेच परिसरातील नागरिकांसाठी हा अनुभव नेत्रसुखद ठरत आहे. येथील आकर्षक रोषणाईची अनेकजण छायाचित्रे व व्हिडिओ घेत आहेत. त्यामुळे हा ब्रिज फक्त वाहतुकीपुरता मर्यादित न राहता नागरिकांसाठी आणि पर्यटकांसाठी एक महत्त्वाचे पर्यटनस्थळ ठरत आहे.

> बटरफ्लाय ब्रिज हा केवळ थेरगाव आणि चिंचवड यांना जोडणारा दुवा नसून, पिंपरी चिंचवड शहराच्या आधुनिक आणि सौंदर्यपूर्ण ओळखीचे प्रतीक आहे. या पुलावरील आकर्षक रोषणाईमुळे नागरिकांना नवा अनुभव मिळत आहे. या ब्रिजचे सौंदर्य जपणे ही आपली सामूहिक जबाबदारी आहे.
>
> **– शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिक.**

> बटरफ्लाय ब्रिजवर फसाड पद्धतीची विद्युत रोषणाई केली आहे. यासाठी वापरण्यात आलेल्या एलईडी दिव्यांमुळे कमीत कमी वीज खर्ची पडते. या पुलावरील विद्युत रोषणाईचा एकूण लोड फक्त २२ किलोवॅट आहे. अशा पद्धतीने पिंपरी चिंचवड शहरातील इतर पुलांवरदेखील आकर्षक विद्युत रोषणाई करण्याचे नियोजन आहे.
>
> **– अनिल भालसाकळे, सहशहर अभियंता, पिंपरी चिंचवड महापालिका.**

### आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नयनरम्य विद्युत रोषणाई

**» थेरगाव येथील बटरफ्लाय ब्रिजप्रमाणेच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून चिंचवड येथील मदर तेरेसा उड्डाणपूल, नाशिक फाटा येथील जे. आर. डी. टाटा उड्डाणपूल यांना नयनरम्य विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. तसेच भक्तीशक्ती येथील उड्डाणपुलावरील विद्युत रोषणाईचे काम प्रगतीपथावर आहे. या विद्युत रोषणाईसाठी एलईडी दिव्यांचा वापर केल्यामुळे कमी विजेमध्ये आकर्षक रोषणाई होत आहे.**

# मोशी प्राधिकरण येथे 'सिल्वराईज ग्रँड स्काय' प्रकल्पाचे भूमिपूजन

## गृहप्रकल्पाचे भूमिपूजन आमदार महेश लांडगे यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले

**पिंपरी | प्रतिनीधी**

मोशी प्राधिकरण (सेक्टर क्र. ६) पाण्याच्या टाकी शेजारी व नवीन आरटीओच्या बाजूला सिल्वराईज ग्रुपतर्फे उभारण्यात येणाऱ्या "सिल्वराईज ग्रँड स्काय" या भव्य गृहप्रकल्पाचे भूमिपूजन आमदार महेशदादा लांडगे यांच्या शुभहस्ते मोठ्या उत्साहात पार पडले.

या प्रसंगी उद्योजक संतोष बारणे, प्रताप बारणे यांच्यासह सिल्वराईज कंपनीचे अधिकारी,



मान्यवर व अनेक नागरिक उपस्थित होते.

सिल्वराईज ग्रुपने आतापर्यंत बांधकाम क्षेत्रात प्रामाणिकपणा, कामाची गुणवत्ता, वेळेचे काटेकोर नियोजन आणि ग्राहकांच्या विश्वासाचे भक्कम अधिष्ठान निर्माण केले आहे. ग्राहकांच्या स्वप्नातील घर वेळेत व गुणवत्तेसह पूर्ण करून देण्याचा विश्वास जपत हा समूह सातत्याने पुढे जात आहे.

याच परंपरेतून उभारण्यात येणाऱ्या "सिल्वराईज ग्रँड स्काय" या भव्य कमर्शियल व रेसिडेन्शियल प्रकल्पाच्या भूमिपूजन सोहळ्याला सिल्वराईज ग्रुपच्या सर्व सहकाऱ्यांनी, मित्रपरिवाराने व कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. सिल्वराईज ग्रुपच्या सातत्यपूर्ण गुणवत्तेमुळे पिंपरी-चिंचवड व पुणे जिल्ह्यातील ग्राहकांचा विश्वास दृढ झाला असून, "ग्रँड स्काय" प्रकल्प या विश्वासाला नवी उंची देणार आहे.

# शहरातील क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत लवकरच वाढ

## प्रभागातील प्रश्न संबंधित क्षेत्रीय कार्यालयांच्या पातळीवर सोडविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारात वाढ

**पुणे | प्रतिनिधी**

प्रभागातील प्रश्न संबंधित क्षेत्रीय कार्यालयांच्या पातळीवर सोडविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारात वाढ करण्याचा; तसेच महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमुळे प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले असल्याने क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत वाढ करण्याचा विचार महापालिकेने सुरू केला आहे. याबाबतचा प्रस्ताव तयार करून राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे, अशी माहिती महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.



महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी १५ क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांची तसेच विविध विभागांच्या प्रमुखांची बैठक घेतली. क्षेत्रीय कार्यालयांच्या सक्षमीकरणासाठी काय केले पाहिजे, यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या अधिकारांमध्ये वाढ करण्याबरोबर क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये मोठी वाढ करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज म्हणाले, महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमुळे महापालिकेची हद्द वाढली आहे. प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयाकडे उपलब्ध असलेले मनुष्यबळ कमी पडते. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांचे सक्षमीकरण करताना आवश्यक मनुष्यबळ देखील उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. महापालिकेचे क्षेत्रफळ वाढल्याने सध्या अस्तित्वात असलेली क्षेत्रीय कार्यालये कमी पडत आहेत. त्यामुळे नवीन क्षेत्रीय कार्यालये तयार करता येतील का? याची चाचपणी बैठकीत करण्यात आली.

राज्य सरकारने क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्यासाठी मान्यता दिल्यास कर्मचारी संख्याही वाढणार आहे. नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या संख्येत वाढ करावी लागणार आहे. ही संख्या वाढल्यास आपोआप मनुष्यबळ वाढविण्यासाठी नोकर भरती करावी लागणार आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत वाढ करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून राज्य सरकारला पाठविण्याबाबत बैठकीत चर्चा झाल्याचे पृथ्वीराज यांनी सांगितले.

> महापालिकेचे क्षेत्रफळ वाढल्याने क्षेत्रीय कार्यालयांवर त्याचा भार येतो. नागरिकांचे प्रश्न तसेच विकासाची कामे तातडीने मार्गी लागावीत, यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न आहे. राज्य सरकारकडे याबाबत प्रस्ताव पाठविला जाणार आहे.
>
> – पृथ्वीराज बी. पी. अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.

महापालिकेत गेल्या तीनपेक्षा अधिक वर्षांपासून नगरसेवक नाहीत. संपूर्ण कारभार हा प्रशासनाच्या हाती आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. या तक्रारी क्षेत्रीय कार्यालयाच्या पातळीवर सोडविण्यात येत नसल्याने नागरिक तक्रारी घेऊन महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये असलेल्या विभागांकडे येतात. त्यामुळे महापालिकेत गर्दी होत असल्याचे चित्र दिसते. क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांना असलेले मर्यादित अधिकारी आणि कमी असलेला निधी यामुळे समस्या सुटत नसल्याची माहिती समोर आली होती. यावर तोडगा काढण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी मंगळवारी बैठक घेत सर्व अधिकाऱ्यांशी संवाद साधून चर्चा केली.

'क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारात वाढ करण्याचे निश्चित करण्यात आले आहे. मलवाहिनी (ड्रेनेज लाईन), रस्ते, अशी मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता भासणारी कामे मुख्य विभागाकडून केली जातील. या कामांची देखभाल दुरुस्ती ही क्षेत्रीय कार्यालयांकडून करण्याचे नियोजन केले जात आहे. महापालिका प्रशासनाकडून पुरेसा निधी क्षेत्रीय कार्यालयांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. तसेच तातडीची कामे करण्यासाठी प्रतीक्षा यादीत निविदा प्रक्रिया ठेवली जाणार आहे, जेणेकरून आवश्यक कामे करण्यासाठी नव्याने निविदा काढण्याचा वेळ जाणार नाही,' असेही पृथ्वीराज बी. पी. यांनी सांगितले.

# महापालिकेच्या विविध विभागांतील 227 अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती

## सहायक आयुक्त, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, कार्यकारी अभियंता यासह विविध पदांचा समावेश

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या विविध विभागांतील २२७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देत बढत्या देण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सहायक आयुक्त, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी, कार्यकारी अभियंता यासह विविध पदांचा समावेश आहे.

महापालिकेतील नगरसेवकांचा १२ मार्च २०२२ ला कार्यकाळ संपला आहे. त्यामुळे मागील साडेतीन वर्षांपासून आयुक्त हेच प्रशासक म्हणून कामकाज पाहत आहेत. महापालिका पदोन्नती समितीची नुकतीच बैठक झाली. या बैठकीत विविध अधिकारी, कर्मचाऱ्यांना सेवा ज्येष्ठतेनुसार बढत्या देण्यात आल्या आहेत. त्याबाबतचा आदेश आयुक्त शेखर सिंह यांनी काढला आहे.

अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, कालावधी, सेवाज्येष्ठतेनुसार मुख्य माहिती अधिकारी १, सहायक आयुक्त ४, कार्यकारी अभियंता (स्थापत्य) १, प्रशासन अधिकारी ६, उपअभियंता (स्थापत्य) ३०, असिस्टंट मेट्रन ३, कार्यालय अधीक्षक ८, मुख्य लिपिक ७२, उपलेखापाल २५, लिपिक ६२, वीजतंत्री ३, कनिष्ठ अभियंता ४, आरोग्य निरीक्षक १, सिस्टर इनचार्ज ३, नाईक ४ अशा २२७ अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली.

महापालिकेत नगरसेवक असताना अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नतीसाठी विधी समिती, सर्वसाधारण सभेच्या मंजुरीनंतरच पदोन्नती मिळते. यामध्ये बराच कालावधी जातो. काही वेळा सभा तहकूब होतात. अनेक वेळा तर




अधिकाऱ्यांना पदाधिकाऱ्यांचे उंबरे झिजवावे लागतात. त्यानंतर पदोन्नती मिळते. मात्र, प्रशासकीय राजवटीत जलद गतीने अधिकाऱ्यांना पदोन्नती मिळत असल्याचे दिसून येत आहे. मागील साडेतीन वर्षांत पाचशेपेक्षा अधिक अधिकारी व कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्यात आली.

# विकासकामांना सरकारी कार्यालयांचाच खोडा

## मुख्यमंत्र्यांकडे तक्रार करण्याचा महापालिका आयुक्त नवल किशोर यांचा पवित्रा

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात विकासाची कामे करताना राज्य सरकारचे विविध विभाग आडमुठी भूमिका घेतात. त्यामुळे कामे करताना अडचणी येतात. महापालिकेच्या विकासकामांबाबत हट्टी भूमिका घेणाऱ्या विभागांची यादी तयार करण्याचे काम सुरू असून, या विभागांची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार असल्याचे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी सोमवारी सांगितले.

शहरातील महत्त्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यासाठी, तसेच गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या विकासकामांना गती मिळावी, यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी 'वॉर रूम'ची स्थापना केली आहे. या माध्यमातून प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आयुक्त राम यांनी संबंधित विभागांच्या प्रमुखांची आणि



'वॉररूम'ची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांची महापालिकेत बैठक घेतली.

'अनेक विकासकामे करण्यासाठी राज्य सरकारशी संबंधित विभागांच्या मान्यतेची आवश्यकता भासते; महापालिकेच्या वतीने या विभागांकडे वारंवार पाठपुरावा करूनही महापालिकेला सकारात्मक प्रतिसाद मिळत नाही, काम करण्याची मान्यता देण्याच्या बदल्यात पालिकेकडून शुल्क आकारले जाते, वेळेत परवानगी दिली जात नाही. परिणामी, कामे रखडून खर्चात वाढ होते,' अशी चर्चा या बैठकीत झाली.

बैठकीनंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना आयुक्त राम म्हणाले, 'राज्य सरकारच्या विविध विभागांकडून अडवणूक केली जात असल्याने विकासकामांचा वेग कमी झाला आहे. महापालिकेला समान पाणी पुरवठा योजनेंतर्गत शहरात जलवाहिनी टाकण्याचे

> नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविणे ही महापालिकेची प्राथमिक आणि महत्त्वाची भूमिका असते. मात्र, विकासकामे करताना अनेकदा शासनाच्या विविध विभागांकडूनच अडवणूक केली जाते. याबाबत शासनाकडे तक्रार करणार आहे.
>
> **– नवल किशोर राम, आयुक्त, पुणे महापालिका.**

काम करायचे आहे. मात्र, जलसंपदा विभाग त्यामध्ये खोडा घालतो. महापालिकेने शुल्क म्हणून १० कोटी रुपये द्यावेत, त्यानंतर जलवाहिनी टाकावी, अशी भूमिका जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांनी घेतली आहे.'

'महापालिकेचे काम हे सर्वसामान्य नागरिकांसाठी केले जाते. त्यामुळे अशा पद्धतीने अडवणूक करणे योग्य नाही. 'टास्क फोर्स'मधील कामांचा आढावा घेताना अनेक प्रकल्पांबाबत अशी स्थिती असल्याचे समोर आले. ठरावीक शुल्क भरल्यानंतरच कामासाठी परवानगी दिली जाईल, अशी भूमिका घेतली जाते,' असे राम यांनी स्पष्ट केले.

'सरकारी विभागांनी घेतलेल्या आठमुठ्या भूमिकेमुळे शहरातील अनेक विकास प्रकल्पांची कामे खोळंबली आहेत. पाटबंधारे विभाग, पोलीस यांच्यासह संरक्षण विभागाच्या कार्यालयांचा यामध्ये समावेश आहे. विकासकामांना अडथळा निर्माण करणाऱ्या विभागांची सविस्तर यादी तयार करण्याच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या आहेत. ही यादी तयार झाली, की संबंधित विभागांची तक्रार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करून त्यांना वस्तुस्थितीची माहिती दिली जाणार आहे.' असेही राम म्हणाले.

---

# क्षेत्रीय कार्यालयाचे अधिकार वाढविणार, पुरेसा निधी देणार

## नवीन क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्याचा प्रस्ताव राज्य सरकारकडे पाठविणार

**पुणे | प्रतिनिधी**

पालिकेच्या मुख्य विभागाकडूनच ड्रेनेजलाइन, रस्ते अशी महत्त्वाची आणि मोठ्या प्रमाणात निधीची आवश्यकता भासणारी कामे केली जाणार आहेत. या कामांची देखभाल-दुरुस्ती ही क्षेत्रीय कार्यालयांकडून करण्याचे नियोजन केले जात आहे. महापालिका प्रशासनाकडून पुरेसा निधी क्षेत्रीय कार्यालयांना उपलब्ध करून दिला जाणार आहे. तातडीची कामे करण्यासाठी प्रतीक्षा यादीत निविदा प्रक्रिया ठेवली जाणार आहे. जेणेकरून आवश्यक कामे करण्यासाठी नव्याने निविदा काढण्याचा वेळ जाणार नाही. या प्रकारे क्षेत्रीय कार्यालयांच्या अधिकारात वाढ केली जाणार आहे. त्याचबरोबरच नवीन क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्याचे विचाराधीन असून, त्याबाबतचा प्रस्ताव तयार करून राज्य सरकारच्या मान्यतेसाठी पाठविण्यात येणार आहे.

महापालिकेत गेल्या तीनपेक्षा अधिक वर्षांपासून नगरसेवक नाहीत. संपूर्ण कारभार हा प्रशासनाच्या हाती आहे. लोकप्रतिनिधी नसल्यामुळे नागरिकांच्या तक्रारी वाढल्या आहेत. या तक्रारी क्षेत्रीय कार्यालयाच्या पातळीवर सुटत नसल्याने नागरिक तक्रारी घेऊन महापालिकेच्या मुख्य इमारतीमध्ये असलेल्या विभागांकडे येतात. त्यामुळे छोट्या कामांसाठी महापालिकेत गर्दी होत असल्याचे चित्र दिसते. क्षेत्रीय कार्यालयांच्या सहायक आयुक्तांना असलेले मर्यादित अधिकारी आणि कमी असलेला निधी यामुळे समस्या



सुटत नसल्याची माहिती समोर आली होती.

यावर तोडगा काढण्यासाठी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी १५ क्षेत्रीय कार्यालयांचे सहायक आयुक्त आणि विविध विभागांचे प्रमुख यांची बैठक झाली. क्षेत्रीय कार्यालयांच्या सक्षमीकरणासाठी काय केले पाहिजे, यावर बैठकीत सविस्तर चर्चा झाली. क्षेत्रीय कार्यालयांना देण्यात आलेल्या अधिकारांमध्ये वाढ करण्याबरोबर क्षेत्रीय कार्यालयांना दिल्या जाणाऱ्या निधीमध्ये मोठी वाढ करण्याबाबत या बैठकीत चर्चा झाली.

महापालिकेच्या हद्दीत समाविष्ट झालेल्या गावांमुळे महापालिकेची हद्द वाढली आहे. प्रभागांचे क्षेत्रफळ वाढले आहे. त्यामुळे क्षेत्रीय

> महापालिकेचे क्षेत्रफळ वाढल्याने क्षेत्रीय कार्यालयांवर त्याचा भार येतो. नागरिकांचे प्रश्न तसेच विकासाची कामे तातडीने मार्गी लागावीत. त्यासाठी सध्या अस्तित्वात असलेल्या क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्याचा प्रयत्न आहे. राज्य सरकारकडे याबाबत प्रस्ताव पाठविला जाणार आहे.
>
> **- पृथ्वीराज बी. पी., अतिरिक्त आयुक्त, पुणे महापालिका.**

कार्यालयाकडे असलेल्या उपलब्ध मनुष्यबळ कमी पडते. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांचे सक्षमीकरण करताना आवश्यक मनुष्यबळ देखील उपलब्ध करून देण्यात यावे, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. महापालिकेचे क्षेत्रफळ वाढल्याने सध्या अस्तित्वात असलेली क्षेत्रीय कार्यालये कमी पडत आहेत. त्यामुळे नवीन क्षेत्रीय कार्यालये तयार करता येतील का? याची चाचपणी बैठकीत करण्यात आली.

राज्य सरकारने क्षेत्रीय कार्यालयांची संख्या वाढविण्यासाठी मान्यता दिल्यास कर्मचारी संख्याही वाढणार आहे. नागरिकांना आवश्यक त्या सोयीसुविधा पुरविण्यासाठी क्षेत्रीय कार्यालयाच्या संख्येत वाढ करावी लागणार आहे. ही संख्या वाढल्यास आपोआप मनुष्यबळ वाढविण्यासाठी नोकर भरती करावी लागणार आहे. त्यामुळे क्षेत्रीय कार्यालयांच्या संख्येत वाढ करण्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाकडून राज्य सरकारला पाठविण्यात येणार आहे.

# कोंढव्यातील कत्तलखान्याचा तिढा अखेर सुटला!

## मंडळाने अखेर कत्तलखाना बंद करण्याचे निर्देश 8 मे रोजी महापालिकेला दिले

**पुणे | प्रतिनिधी**

प्रदूषण नियमांचा भंग केल्याप्रकरणी पुणे महापालिकेचा कोंढव्यातील कत्तलखाना बंद करण्याचे निर्देश महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने मे महिन्यात दिले होते. त्यामुळे हा कत्तलखाना बंद करण्यात आला होता. अखेर हा कत्तलखाना सुरू करण्यास मंडळाने सशर्त परवानगी दिल्याने तो आता सुरू झाला आहे. याचबरोबर दोन लाख रुपयांची बँक हमीही मंडळाने महापालिकेकडून घेतली आहे.

पुणे शहरात महापालिकेचा कोंढव्यात एकमेव कत्तलखाना आहे. या कत्तलखान्यात प्रामुख्याने म्हैसवर्गीय प्राण्यांची कत्तल केली जाते. या कत्तलखान्यामुळे प्रदूषण होत असल्याची तक्रार स्थानिकांकडून वारंवार करण्यात आली होती. त्यामुळे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कत्तलखान्याची तपासणी केली होती. त्या वेळी नियमांचे उल्लंघनप्रकरणी महापालिकेला नोटीस बजावून कत्तलखान्याच्या ठिकाणी प्रदूषण कमी करण्यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश दिले होते. मंडळाने नोटीस बजाविल्यानंतरही महापालिकेने ठोस उपाययोजना केल्या नव्हत्या. त्यामुळे मंडळाने अखेर कत्तलखाना बंद करण्याचे निर्देश ८ मे रोजी महापालिकेला दिले. त्यामुळे अखेर महापालिकेने हा कत्तलखाना बंद केला होता.

कत्तलखान्यास पर्यायी व्यवस्था नसल्यामुळे कत्तलखान्याच्या ठिकाणी प्रदूषण कमी करणाऱ्या उपाययोजना सुरू करून मुदतवाढ देण्याची मागणी महापालिकेने मंडळाकडे केली होती. मंडळाने महापालिकेने कत्तलखान्याच्या ठिकाणी केलेल्या उपाययोजनांची तपासणी करून तो पुन्हा सुरू करण्यास १३ ऑगस्टला सशर्त परवानगी दिली. त्यानुसार, मर्यादित स्वरूपात कत्तलखाना सुरू झाला असून, टप्प्याटप्प्याने याची क्षमता वाढविण्यात येणार आहे. यासाठी महापालिकेला मंडळाकडे दोन लाख रुपयांची बँक हमी भरावी लागणार आहे. याचबरोबर तिथे निर्माण होणाऱ्या जैविक कचऱ्याची विल्हेवाट लावावी लागणार आहे.

### सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाच्या उपाययोजना

- नवीन फ्लो मीटर
- सर्व टाक्यांची स्वच्छता
- सर्व पंपांची दुरुस्ती व देखभाल
- एअर ब्लोअरची दुरुस्ती
- प्रकल्प परिसराची स्वच्छता

> शहरात महापालिकेचा सध्या एकच कत्तलखाना आहे. त्यामुळे तो पुन्हा सुरू करण्यास परवानगी मागण्यात आली होती. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने यास परवानगी दिली आहे. सध्या १० मोठ्या जनावरांची कत्तल केली जात असून, टप्प्याटप्प्याने त्यात वाढ केली जाणार आहे. ही क्षमता डिसेंबरपर्यंत ७० मोठ्या जनावरांपर्यंत नेण्याचे नियोजन आहे.
>
> – डॉ. सारिका फुंडे, मुख्य पशुवैद्यकीय अधिकारी, महापालिका

# तब्बल 323 कोटींचा ‘अमृत’ निधी; ड्रेनेजकामे होणार सुसाट

## 23 पैकी 16 गावांतील कामांची लवकरच राबवली जाणार निविदा प्रक्रिया

**पुणे | प्रतिनिधी**

महापालिकेत समाविष्ट झालेल्या 23 गावांपैकी 16 गावांमध्ये ड्रेनेज लाइन टाकण्याच्या कामांना आता गती मिळणार आहे. केंद्र सरकारच्या अमृत योजनेअंतर्गत या कामांसाठी 323 कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी मिळाली आहे. या कामांची निविदा प्रक्रिया लवकरच राबविण्यात येईल, अशी माहिती अतिरिक्त महापालिका आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली.

महापालिकेकडे समाविष्ट गावांमध्ये पायाभूत सुविधा नसल्याने ड्रेनेज, एसटीपी प्लांट आणि इतर कामांसाठी केंद्राकडून निधी मागविण्यात आला होता. त्यापैकी ड्रेनेज लाइनसाठीचा आराखडा केंद्राने मंजूर केला आहे.



त्यामुळे लवकरच या गावांमध्ये ड्रेनेज लाईनचे काम सुरू होणार आहे. मात्र, सुमारे 190 कोटी रुपयांचा एसटीपी प्रकल्पाचा आराखडा अद्याप शासनाकडे प्रलंबित असल्याचे पृथ्वीराज यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत प्रकल्पाच्या खर्चात केंद्र आणि राज्य शासन प्रत्येकी 25 टक्के तर उर्वरित 50 टक्के खर्च महापालिकेला करावा लागणार आहे. “आराखडा तयार असून, आतापर्यंत निधीअभावी निविदा काढता आली नव्हती. मात्र, मंजुरी मिळाल्याने आता प्रक्रिया वेगाने पार पडेल,” असेही पृथ्वीराज यांनी स्पष्ट केले. समाविष्ट गावांपैकी म्हाळुंगे येथील टीपी स्कीममधील ड्रेनेजचे काम पीएमआरडीएमार्फत होणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

दरम्यान, यापूर्वी समाविष्ट करण्यात आलेल्या 11 गावांपैकी फुरसुंगी आणि उरूळी देवाची वगळता नऊ गावांमधील 68 टक्के, म्हणजेच 180 किलोमीटर ड्रेनेजचे काम पूर्ण झाले आहे. लोणी येथील रिफायनरीलगतच्या भागातील कामासाठी केंद्रीय पातळीवर पाठपुरावा करून परवानगी मिळाली असून, उर्वरित कामेही लवकरच मार्गी लागणार असल्याचे पृथ्वीराज यांनी सांगितले.

### ...या 16 गावांमध्ये होणार ड्रेनेज लाइनची कामे

- सूस, महाळुंगे, कोंढवे धावडे, न्यू कोपरे, नऱ्हे, जांभुळवाडी, कोळेवाडी, भिलारेवाडी, गुजर निंबाळकरवाडी, मांगडेवाडी, सणसनगर, किरकिटवाडी, नांदोशी, नांदेड, खडकवासला आणि पिसोळी.

### निवडणुका रखडल्याने मिळाला नाही 15 व्या वित्त आयोगाचा निधी

- शहरातील विविध प्रकल्पांसाठी महापालिकेने 15व्या वित्त आयोगाकडून निधीची मागणी केली होती. मात्र, महापालिकेच्या निवडणुका न झाल्याने आयोगाकडून निधी मंजूर झाला नाही. त्यामुळे काही प्रकल्प रखडले असल्याचेही अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी स्पष्ट केले.